महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५१ Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्रमांक : क्र. अधापु- २०१९/ प्र.क्र. १२७/ना.पु.-२२ दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२०

प्रति

१) जिल्हाधिकारी, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा.

२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा.

३) अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर.

**विषय :- रब्बी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये किमान आधारभूत योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या मक्याचे वितरण लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत करण्याकरिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२० करिता दिलेल्या नियतनात सुधारणा करण्याबाबत.**

संदर्भ :- १) शासन परिपत्रक समक्रमांक दि. २२.०७.२०२०.
२) शासन पत्र क्र. अधापु- २०२०/ प्र.क्र. ३१/ना.पु.-२२, दि. २७.०८.२०२० व दि. २०.१०.२०२०.

संदर्भाधिन दि. २२.०७.२०२० च्या शासन परिपत्रकान्वये रब्बी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये किमान आधारभूत योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या मक्याचे वितरण त्या प्रमाणात गव्हाचे नियतन कमी करुन माहे ऑगस्ट, २०२० पासून परस्पर सुरु करण्याच्या सूचना संबंधितांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. गडचिरोली जिल्ह्यात सदर जिल्ह्याकरिता आवश्यक असलेल्या प्रमाणापेक्षा अधिक मका उपलब्ध असल्याने सदर मक्याचे वितरण गडचिरोली व्यतिरिक्त नागपूर, नागपूर शहर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यात करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दि. २७.०८.२०२० च्या शासन पत्रान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत उपरोक्त जिल्ह्यांना माहे नोव्हेंबर, २०२० करिता तसेच गडचिरोली जिल्ह्याकरिता माहे नोव्हेंबर, २०२० व डिसेंबर, २०२० करिता दिलेल्या गव्हाच्या नियतनाचे परिमाण कमी करुन त्याऐवजी मक्याचे नियतन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याबाबतचे विवरणपत्र "अ" (माहे नोव्हेंबर, २०२० करिता) व विवरणपत्र "ब" (माहे डिसेंबर, २०२० करिता) सोबत जोडण्यात आली असून सदर विवरणपत्रांत नमूद परिमाणानुसार गहू व मक्याचे वितरण करण्यात यावे. दि. २७.०८.२०२० व दि. २०.१०.२०२० च्या शासन पत्रान्वये दिलेल्या तांदळाचे परिमाण

व नियतन कायम राहील. आपल्या जिल्ह्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मक्याचे विहीत कालावधीत वितरण होईल, याची दक्षता घ्यावी.

३. आपल्या जिल्ह्यातील विद्यमान वाहतूकदारांकडून लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता विहीत केलेल्या दराने मक्याची वाहतूक करण्यात यावी. वाहतूक खर्च कमी होण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्ह्यांना त्या जिल्ह्याच्या सीमेपासून कमीत कमी अंतरावरील तालुका गोदामात मका उपलब्ध होईल, याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांनी संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याशी चर्चा करुन नियोजन करावे. विहीत कालावधीत मक्याची उचल पूर्ण होईल, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. सदर मक्याच्या वाहतूकीकरिता येणारा अतिरिक्त खर्च लेखाशीर्ष ४४०८०३९१ मधील सन २०२०-२१ मध्ये उपलब्ध असलेल्या मंजूर निधीतून भागविण्यात यावा.

४. संदर्भाधिन दि. २२.०७.२०२० च्या शासन परिपत्रकातील इतर सर्वसाधारण सूचना कायम राहतील.

(मनोजकुमार सुर्यवंशी)
शासनाचे सह सचिव

सोबत:- विवरणपत्र

प्रत:- १) महाव्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, मुंबई.

२) उप आयुक्त (पुरवठा), नागपूर यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती "महाफूड" आज्ञावलीत दर आठवडयास भरली जाण्याची योग्य ती दखल घ्यावी.

३) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा. तसेच सातत्याने पाठपुरावा करुन Google drive वर उचल व वाटपाबाबतची माहिती संकलत करण्याची सर्व जबाबदारी उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांची राहील.

४) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.

(मनोजकुमार सुर्यवंशी)
शासनाचे सह सचिव

सोबत:- विवरणपत्र

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

## शासन पत्र क्रमांक अधापु 2019 / प्र.क्र. 127 / ना.पु. -22 , दि. 28.10.2020 सोबतचे विवरणपत्र "अ"

### माहे नोव्हेंबर, 2020 साठी गव्हाचे सुधारित नियतन व मक्याचे नियतन

| जिल्हा | AAY कार्डसंख्या | PHH सदस्यसंख्या | गव्हाचे सुधारित परिमाण | | मक्याचे परिमाण | | गव्हाचे सुधारित नियतन (मे.टन) | | मक्याचे नियतन (मे.टन) | | दि. 27.8.2020 च्या शासन पत्रान्वये दिलेल्या गव्हाच्या नियतनानुसार एकूण नियतन (गहू +मका) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH |
| गडचिरोली | 101715 | 443997 | 5 | 1 | 5 | 1 | 509 | 444 | 509 | 444 | 1017 | 888 |
| चंद्रपूर | 140155 | 1058007 | 10 | 2 | 5 | 1 | 1402 | 2116 | 701 | 1058 | 2102 | 3174 |
| गोंदिया | 79696 | 682471 | 7 | 1 | 3 | 1 | 558 | 682 | 239 | 682 | 797 | 1365 |
| भंडारा | 66400 | 745400 | 7 | 1 | 3 | 1 | 465 | 745 | 199 | 745 | 664 | 1491 |
| वर्धा | 48186 | 884214 | 10 | 2 | 5 | 1 | 482 | 1768 | 241 | 884 | 723 | 2653 |
| नागपूर (अ.वि.अ. | 45238 | 1401600 | 10 | 2 | 5 | 1 | 452 | 2803 | 226 | 1402 | 679 | 4205 |
| नागपूर (जि.पु.अ. | 78640 | 1347084 | 10 | 2 | 5 | 1 | 786 | 2694 | 393 | 1347 | 1180 | 4041 |
| एकूण | | | | | | | 4653 | 11254 | 2508 | 6563 | 7161 | 17816 |

## शासन पत्र क्रमांक अधापु 2019 / प्र.क्र. 127 / ना.पु. -22 , दि. 28.10.2020 सोबतचे विवरणपत्र "ब"

### माहे डिसेंबर, 2020 साठी गव्हाचे सुधारित नियतन व मक्याचे नियतन

| जिल्हा | AAY कार्डसंख्या | PHH सदस्यसंख्या | गव्हाचे सुधारित परिमाण | | मक्याचे परिमाण | | गव्हाचे सुधारित नियतन (मे.टन) | | मक्याचे नियतन (मे.टन) | | दि. 28.7.2020 च्या शासन पत्रान्वये दिलेल्या गव्हाच्या नियतनानुसार एकूण नियतन (गहू +मका) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH |
| गडचिरोली | 101715 | 443997 | 4 | 1 | 6 | 1 | 407 | 444 | 610 | 444 | 1017 | 888 |

Government of Maharashtra
Food, Civil Supplies & Consumer Protection Department,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,,
Mantralay Annex, Mumbai-400 032

Telephone: 022-22793051
Email ID : napu22.mhpds@gov.in

---

No.- ADHAPU-2029/C.R. 127/CS-22
Date :- 28th October, 2020

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex, Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (E), Mumbai- 400 066.

Sub :- Revised Monthly Allocation of Foodgrains for Priority Households & AAY Category under NFSA, 2013 for the month of November, 2020 & December, 2020.

Ref :- 1) Govt. of India letter No. 1-3/2014.BP.III, Dtd. 12.5.2020.
2) State Govt. Letter no. ADHAPU-2029/C.R. 31/CS-22, Dtd. 27th August, 2020 & 20th December, 2020.
3) State Govt. Letter of even no. dated 28th Oct., 2020.

Sir,

Government of India vide its above referred letter dated 12.5.2020 has sanctioned monthly allocation for Priority households & AAY category under NFSA, 2013 for the month of July, 2020 and onwards. Accordingly, the State Government has issued district wise allocation orders for the month of November, 2020 vide above referred letter dated 27th August, 2020 & for the month of December, 2020 vide above referred letter dated 20th October, 2020. However, quantity of wheat allotted for the month of November & December, 2020 for some districts have been revised in order to distribute coarse grains procured in RMS 2020-21 vide letter dated 28th Oct., 2020.

You are therefore requested to release the revised allocated quota for Priority households & AAY category to the nominees of District Collector's and Controller of Rationing, Director, Civil Supplies, Mumbai as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

(Manojkumar Suryavanshi)
Joint Secretary to Government of Maharashtra

Copy to:1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.